महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणातील वित्त नियंत्रक या पदाचा अतिरिक्त कार्यभार वित्त नियंत्रक, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांच्याकडे सोपविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग
शासन आदेश क्रमांकः स्थासंअ/२०१६/प्र.क्र.१८/दुवपु-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
तारीख: २० फेब्रुवारी, २०१७

वाचा :-

१) शासन निर्णय क्रमांक : गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय क्र. एचआरए २०१६/प्र.क्र.६४/ दुवपु-२, दिनांक २६ डिसेंबर २०१६
२) स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाचे दिनांक १४ फेब्रुवारी २०१७ चे पत्र

शासन आदेश:-

स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ मधील तरतूदीनुसार राज्यात नियमित स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाची स्थापना होईपर्यत श्री.गौतम चटर्जी, विशेष कार्यकारी अधिकारी,मुख्यमंत्री सचिवालय यांना स्थावर संपदा नियामक प्राधिकरण म्हणून संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये नामनिर्देशित करण्यात आले आहे. प्राधिकरणाने संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये शासनास विनंती केल्यानुसार त्यांचे कार्यालयीन कामकाज सुलभ होण्याकरिता प्राधिकरणाचा आकृतीबंध निश्चित होवून प्राधिकरणातील वित्त नियंत्रक या पदावर नियमित नियुक्ती होईपर्यत सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार वित्त नियंत्रक, झोपडपट्टी पुनर्वसन योजना यांच्याकडे सोपविण्यात येत आहे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०२२२१६४५२६६९०९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Meenal Dilip Pednekar

Digitally signed by Meenal Dilip Pednekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=d3ff92ae3a8e5839988ca45db0eee3f448a9c88472103709dc1e857938d39c04, cn=Meenal Dilip Pednekar
Date: 2017.02.22 16:47:10 +05'30'

(मीनल पेडणेकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री, गृहनिर्माण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२. मा. राज्यमंत्री, गृहनिर्माण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

३. स्थावर संपदा नियामक प्राधिकरण,गृहनिर्माण भवन,वांद्रे (पूर्व),मुंबई-५१

४. महालेखापाल,महाराष्ट्र -१/२ यांचे कार्यालय ,मुंबई/नागपूर .

५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

६. निवासी लेखा परिक्षा अधिकारी,मुंबई.

७. प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई -३२.

८. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,न.चि.केळकर मार्ग, वांद्रे (पू), मुंबई -५१.

९. उप सचिव, गृहनिर्माण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई -३२.

१०. सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी , गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

११. निवडनस्ती- दुवपु-२.